**आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाज बांधवाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग**
**आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.१२१/मावक**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०७ ऑगस्ट, २०१९

**प्रस्तावना -:**

धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसंदर्भात संदर्भात मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मा.मंत्रीमंडळ उपसमितीची बैठक दि.०२ मार्च, २०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तातील अ.क्र.१ येथे नमूद मुद्दयाच्या अनुषंगाने धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याच्या अनुषंगाने टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेने दिलेल्या अहवालावर महाअभिवक्ता यांचे अभिमत घेवून आरक्षणाबाबतचा निर्णय होईपर्यंत अनुसूचित जमातीसाठी ज्या योजना आदिवासी विकास विभागामार्फत सुरु आहेत, त्या सर्व योजना धनगर समाजाला लागू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

२. सन २०१९ च्या माहे जुलै मधील अर्थसंकल्पिय अधिवेशनात मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी केलेल्या अर्थसंकल्पिय भाषणातील बाब क्र. ७४ अन्वये आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी समाजाच्या उन्नतीकरीता ज्या योजना राबविल्या जातात त्याच धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विविध २२ योजना राबविण्याचा शासनाचा मानस असल्याची घोषणा करण्यात आली आहे. सदर घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी रु.१०००.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचेही विधानमंडळात घोषित करण्यात आले आहे. सदर घोषणेस अनुलक्षून २२२५ E८२१ व २२२५ E९३७ या दोन लेखाशिर्षाखाली प्रत्येकी रु.२५०.०० कोटी याप्रमाणे एकूण रु.५००.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

३. उक्त पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाच्या योजना जशाच्या तशा धनगर समाजाला लागू करण्याबाबत मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण ) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८ जुलै, २०१९ तसेच दि.१७ जुलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेदरम्यान खाली नमूद योजनांचा लाभ विविध प्रशासकीय विभागांच्या चालू योजनांद्वारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना मिळत असल्याचे निदर्शनास आले.

## भटक्या जमाती-क प्रवर्गातील घटकांना लाभ मिळत असलेल्या योजनांचा तपशील (प्रपत्र-अ)

| अ.क्र. | धनगर समाजासाठी सुरु असलेल्या योजना |
|---|---|
| १. | शेतकऱ्यांना विजपंप व तेलपंपाचा मोफत पुरवठा |
| २. | शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी कृषि क्रांती योजना यामध्ये १०० टक्के अनुदानावर नवीन विहित, जुनी विहिर दुरुस्ती, इनवेल बोअरींग, विज जोडणी आकार, शेततळयाचे प्लास्टिक अस्तरीकरण, परसबाग, तुषार/ ठिबक सिंचन पुरवठा, पंप संच व पीव्हीसी/ एचडीइपी पाईप |
| ३. | पशुवैद्यकिय सेवा व पशुआरोग्य सेवा पुरविणे, लाभार्थ्यांना शेळयांचे गट, दुधाळ जनावरांचे गट, महिला सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण कार्यक्रम व स्वयंप्रकल्प. |
| ४. | मत्स्यबीज उत्पादन व पुरवठा |
| ५. | गावे व वाडयांसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम. |
| ६. | शेतकऱ्यांच्या कृषि पंपांना विजपुरवठा देणे, घरगुती विज जोडण्या देणे, आदिवासी वाडया, पाडयांचे विद्युतीकरण (डीपीडीसी योजना) |
| ७. | जिल्हा उद्योग केंद्र योजनेंतर्गत धनगर समाजाच्या निमशहरी व ग्रामीण भागातील सुक्ष्म उद्योगांना अर्थसहाय्य (डीपीडीसी योजना) |
| ८. | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान |
| ९. | दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना |
| १०. | किसान रोप वाटीका योजना |
| ११. | मुला मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना |
| १२. | मुला मुलींना पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना (Pre Matric) |
| १३. | मुला मुलींना भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती (Post Matric) |
| १४. | युवक युवतींना शासकीय निमशासकीय, खाजगी संस्थेत अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, पशुवैद्यकीय, कृषी, शिक्षणशास्त्र, व्यावसायिक व कौशल्य विकास प्रशिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती योजना (Freeship) |
| १५. | शेतीला उपयोगी अवजारे, यंत्र सामुग्री, खते, बियाणे, ई. मिळणे बाबतच्या योजना |
| १६. | बेरोजगरांना उद्योग धंद्यासाठी लागणारी यंत्र सामग्री, भांडवल,इ. पुरवठयाची योजना |

४. उक्त प्रपत्र-अ मध्ये नमूद योजनांचा लाभ राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांमार्फत कार्यान्वित असलेल्या योजनांच्या माध्यमातून भटक्या जमाती-क प्रवर्गातील घटकांना घेता येत असल्यामुळे सदर योजनांचा विचार करण्यात आलेला नाही. तथापि, आदिवासी विकास विभागाच्या अनुसूचित जमातीसाठी असलेल्या योजनांपैकी ज्या योजनांचा लाभ भटक्या जमाती-क प्रवर्गातील घटकांना आजमितीस मिळत नाही, अशा योजना जशाच्या तशा भटक्या जमाती-क या प्रवर्गातील घटकांना लागू करण्यासंदर्भात बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने खालील योजना भटक्या जमाती-क या प्रवर्गातील घटकांना लागू करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

## शासन निर्णय :-

आदिवासी विकास विभागाच्या अनुसूचित जमातीसाठी असलेल्या योजनांपैकी खालील योजना भटक्या जमाती-क या प्रवर्गातील घटकांना लागू करण्यात येत आहेत. सदर योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून लागू होतील.

**योजना क्र.१ :-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील भूमीहिन मेंढपाळ कुटुंबांसाठी अर्धबंदिस्त, बंदिस्त, मेंढीपालनासाठी जागा उपलब्ध करुन देणे किंवा जागा खरेदीसाठी अनुदान तत्वावर अर्थसहाय्य देणे.

**योजनेचे स्वरुप:-** मेंढपाळ कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी २० मेंढया व १ नरमेंढा एवढे पशुधन बाळगणाऱ्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील भूमिहिन मेंढपाळ कुटुंबांची भटकंती थांबविण्यासाठी व त्यांना बंदिस्त /अर्धबंदिस्त मेंढीपालनासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित आहे. ज्या मेंढपाळ कुटुंबाच्या मालकी हक्कामध्ये महाराष्ट्रात कोठेही शेतजमीन / पडीक जमीन नाही असे भूमिहिन मेंढपाळ कुटुंबातील कुटुंब प्रमुख असलेल्या कोणत्याही एका व्यक्तिस (पुरुष किंवा स्त्री) यांनाच सदर योजनेचा लाभ मिळेल.

सर्वसाधारणपणे २० मेंढया व १ नरमेंढा एवढे पशुधन बाळगण्यासाठी सुमारे एक गुंठा जमीन पुरेशी होते. तद्नुषंगाने लाभार्थी कुटुंबातील कुटुंब प्रमुख एकतर अशी जमीन स्वत: विकत घेऊ शकतील किंवा खाजगी व्यक्तीच्या मालकीची जमीन ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडे करारावर उपलब्ध करुन घेऊ शकतील. त्यासाठी जमीनीच्या किंमतीच्या किंवा भाडयापोटी द्यावयाच्या रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम अनुदान म्हणून लाभार्थ्यास शासनामार्फत देण्यात येईल. सदर योजना पशुसंवर्धन विभागाच्या सहमतीने विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. ७०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.२ :-** वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना कार्यान्वित करणे.

**योजनेचे स्वरुप:-** आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीमधील इयत्ता बारावीनंतरच्या मान्यता प्राप्त तंत्रशिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे परंतू शासकीय वसतिगृहातील प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून शासन निर्णय क्रमांक. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना लागू करण्यात आली. त्याचधर्तीवर सन २०१९-२० पासून महापालिका, महसूली विभागस्तरीय शहरे, जिल्हयाची ठिकाणे तसेच इयत्ता १२ वी नंतरचे मॅट्रीकोत्तर उच्च शिक्षण शासन मान्यता प्राप्त तंत्रशिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील पात्र विद्यार्थी/ विद्यार्थीनींना भोजन

भत्ता, निवास भत्ता, निर्वाह भत्ता  तसेच शैक्षणिक साहित्य व इतर साहित्यासाठी लागणारा खर्च हा विद्यार्थ्याच्या आधारसंलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने अर्जासोबत जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.  विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्षपेक्षा कमी असावे,  विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.  दिव्यांग विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ प्राधान्याने देय राहील.  इयत्ता बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त ०७ वर्षे घेता येईल.  योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरलेला विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास, अनुत्तीर्ण कालावधीमध्ये या योजनेंतर्गत लाभ घेण्यास अपात्र ठरेल.  तद्नंतर हा विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यास पुढील कालावधीसाठी योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

मुंबई महानगरपालिका विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील (मुंबई शहर, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे)  तसेच पुणे, नागपूर व औरंगाबाद या शहरातील विद्यार्थ्यांसाठीचा प्रतिविद्यार्थी खर्च रु.६०,०००/- एवढा राहील.

इतर महसूली विभाग स्तरीय  शहरे व  क वर्ग महापालिका क्षेत्रामध्ये मॅट्रीकोत्तर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीचा प्रतिविद्यार्थी खर्च  रु. ५१,०००/- एवढा राहील.

इतर जिल्हयाच्या ठिकाणी मॅट्रीकोत्तर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीचा प्रतिविद्यार्थी खर्च  रु. ४३,०००/- एवढा राहील.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी  वार्षिक रु. १५०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता  देण्यात येत आहे.  सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

**योजना क्र.३ :-**  भटक्या जमाती-क या प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांत प्रवेश देणे.

**योजनेचे स्वरुप**:- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षण देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने दि.२८ ऑगस्ट, २००९ रोजीच्या शासन निर्णय क्र.शाआशा-२००८/प्र.क्र.८१/का-१३ अन्वये योजना कार्यान्वित केली आहे. त्याचधर्तीवर उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमासाठी इंग्रजी माध्यमाचा वापर होत असल्यामुळे भटक्या जमाती-क या प्रवर्गातील विद्यार्थी उच्च शिक्षणात मागे पडू नयेत,  तसेच  उच्च शिक्षणाच्या बदलत्या परिस्थितीशी त्यांना जुळवून घेणे शक्य व्हावे यासाठी या समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये  शिक्षण देणेसाठी ही योजना प्रस्तावित आहे.

सदर योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतचे शिक्षण देण्यात येईल.  योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याच्या पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.१.०० लक्ष एवढी राहील.  भटक्या जमाती-क या प्रवर्गातील विधवा/ घटस्फोटित/निराधार/परित्यक्त्या यांची मुले व दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील

मुलांना प्राधान्य राहील. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. १५०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.४ :-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील ग्रामीण भागातील बेघर कुटुंबांना पहिल्या टप्प्यात १०,००० घरकुले बांधून देणे.

**योजनेचे स्वरुपः-** विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकांसाठी दि.२४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णय क्र. गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१ अन्वये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुधारित स्वरुपात लागू करण्यात आली आहे. सदर योजना वैयक्तिक तसेच सामुहिक लाभाची आहे. या योजनेच्या धर्तीवर ग्रामीण क्षेत्रात वास्तव्य करीत असलेल्या व मागील किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असलेल्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील ग्रामीण भागात राहणाऱ्या बेघर कुटुंबांना घरकुल बांधून देण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना वैयक्तिक स्वरुपाची राहील. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. १५०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.५ :-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पित निधी उपलब्ध नसलेल्या योजना / कार्यक्रम राबविण्यासाठी न्युक्लिअस बजेट योजना.

**योजनेचे स्वरुपः-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील घटकांसाठी कार्यान्वित असलेल्या किंवा कार्यान्वित करावयाच्या योजनांव्यतिरिक्त विवक्षित कारणास्तव एखादी योजना / कार्यक्रम काळाची गरज म्हणून राबविणे शासनास आवश्यक वाटल्यास अशा योजना व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी लागणारा निधी उपलब्ध होण्यासाठी न्युक्लिअस बजेट प्रस्तावित आहे. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. ५०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.६ :-** राज्यातील भटक्या जमाती-क या प्रवर्गातील सभासदांच्या सहकारी सूत गिरण्यांना भागभांडवल मंजूर करणे.

**योजनेचे स्वरुपः-** आदिवासी विकास विभागाच्या दि.१४ ऑक्टोबर, १९९८ रोजीचा शासन निर्णय क्र.आविम-१०९६/ प्र.क्र.१४३/का-०३ अन्वये आदिवासी सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवल मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचधर्तीवर भटक्या जमाती-क या प्रवर्गातील व्यक्ती सदस्य असलेल्या व महाराष्ट्र सहकारी संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांमार्फत

स्थापन करण्यात आलेल्या सहकारी सूत गिरण्यांना भागभांडवल मंजूर करण्याचे सदर योजनेद्वारे प्रस्तावित आहे. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेंतर्गत संबंधित सहकारी सूत गिरणीस रु.२५,०००/- किंवा सूत गिरणीसाठीचे कर्ज व भागभांडवलीचे प्रमाण १:१ ठेवून १:९ या प्रमाणात भागभांडवल पुरविण्यात येईल. सूत गिरणीचा अध्यक्ष व उपाध्यक्ष भटक्या जमाती-क या प्रवर्गातील असावा. सहकारी सूत गिरणीचे ८०% सभासद भटक्या जमाती-क या प्रवर्गातील तर २०% सदस्य अन्य प्रवर्गातील असावेत.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. ५०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.७ :-** केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेत भटक्या जमाती-क या प्रवर्गातील नवउद्योजकांना सहाय्य करण्यासाठी मार्जिन मनी उपलब्ध करुन देणे.

**योजनेचे स्वरुप:-** केंद्र शासनाने २०१५ मध्ये स्टँड अप इंडिया ही योजना घोषित केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया या योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र ठरलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या नवउद्योजकांना प्रकल्प किंमतीच्या १५% मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासन निर्णय क्र.आविमं-२०१९/ प्र.क्र.१८/का-०३, दि.२० जून, २०१९ अन्वये आदिवासी विकास विभागामार्फत निर्गमित करण्यात आला. त्याचधर्तीवर भटक्या जमाती-क या प्रवर्गातील नवउद्योजकांना आर्थिक सहाय्य करण्याचे सदर योजनेद्वारे प्रस्तावित आहे. सदर योजनेंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी प्रकल्प किंमतीच्या ७५% निधी बँकेमार्फत उपलब्ध होणाऱ्या कर्जाद्वारे उभा करावयाचा असून लाभार्थ्यांने भरावयाच्या २५% निधीपैकी केवळ १०% निधी लाभार्थ्याने दयावयाचा आहे. उर्वरित १५% निधी मार्जिन मनी म्हणून शासनाद्वारे उपलब्ध करुन दयावयाचा आहे.

सदर योजनेचा लाभ केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेसाठी पात्र ठरलेल्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील नवउद्योजकांना अनुज्ञेय राहील. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. ५०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.८ :-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील मेंढपाळ कुटुंबांना पावसाळयात चराईकरिता जून ते सप्टेबर या ४ महिन्यासाठी चराई अनुदान देणे. (प्रायोगिक तत्वावर)

**योजनेचे स्वरुप:-** राज्यातील भटक्या जमाती-क या प्रवर्गातील मेंढपाळ कुटुंबांकडे असलेल्या मेंढयांच्या पालनपोषणासाठी सर्वसाधारणपणे शासकीय गायरान जमिनी, पडीक शेतजमीनी व डोंगर इ. परिसरात मेंढपाळ आपल्या मेंढया चराईसाठी नेतात. सदर क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारित असल्यास मेंढपाळ व वन विभाग यांच्यामध्ये संघर्ष / वादविवाद होतात. त्याद्वारे मेंढयांच्या पालनपोषणामध्ये

व्यत्यय निर्माण होतो. याबाबींवर मात करण्यासाठी राज्यातील किमान २० मेंढया व १ नर एवढे पशुधन असलेल्या (यापेक्षा जास्त पशुधन असलेल्या लाभार्थ्यांनासुध्दा) मेंढपाळ कुटुंबांना प्रतिमाह रु.६०००/- याप्रमाणे माहे जून ते सप्टेबर या ४ महिन्यासाठी एकूण रु.२४,०००/- एवढे चराई अनुदान प्रत्येक वर्षी देण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना निव्वळ प्रायोगिक तत्वावर पशुसंवर्धन विभागाच्या सहमतीने विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. १००.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.९ :-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील होतकरु बेरोजगार पदवीधर युवक युवतींना स्पर्धा परिक्षेसाठी परीक्षापूर्व निवासी प्रशिक्षण.

**योजनेचे स्वरुप:-** पदवी अभ्यासक्रम किमान ५०% गुणासह उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना केंद्रिय लोकसेवा आयोग तसेच राज्य लोकसेवा आयोग यांच्यामार्फत घेण्यात येत असलेल्या स्पर्धा परीक्षांना भटक्या जमाती-क या प्रवर्गातील गुणवंत पदवीधर युवक युवतींना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक ती पूर्व तयारी करणे, परीक्षा देण्यासाठी आवश्यक असलेले अभ्यास साहित्य व इतर अनुषंगिक सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच यासाठी आवश्यक ते मुलभूत प्रशिक्षण देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित आहे. “सारथी” या स्वायत्त संस्थेच्या धर्तीवर नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून ही योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. ५.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.१० :-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील बेरोजगार युवक युवतींना स्पर्धा परिक्षेसाठी परिक्षा शुल्कात आर्थिक सवलती लागू करणे.

**योजनेचे स्वरुप:-** कोणत्याही शाखेतील पदवी अभ्यासक्रम किमान ६०% गुणांसह उत्तीर्ण केलेल्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील गुणवंत युवक युवतींना बिकट आर्थिक परिस्थितीमुळे स्पर्धा परिक्षांना सामोरे जाण्याच्या संधीपासून दूर राहावे लागू नये यासाठी ही योजना प्रस्तावित आहे. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. १०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.११ :-** भटक्या जमाती-क या प्रवर्गातील बेरोजगार युवक युवतींना लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी आवश्यक ते मूलभूत प्रशिक्षण देणे.

**योजनेचे स्वरुप:-** कोणत्याही शाखेतील पदवी अभ्यासक्रम किमान ६०% गुणांसह उत्तीर्ण केलेल्या भटक्या जमाती-क या प्रवर्गातील गुणवंत युवक युवतींना “सारथी” या स्वायत्त संस्थेच्या धर्तीवर नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलिस भरतीसाठी आवश्यक ते मूलभूत प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. ५.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.१२ :-** ग्रामीण परिसरातील कुक्कुटपालन संकल्पनेंतर्गत भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील घटकांना ७५ टक्के अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारित देशी (सीएआरआय- मान्यता प्राप्त) प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपनासाठी अर्थसहाय्य.

**योजनेचे स्वरुप :-** पशुसंवर्धन विभागामार्फत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी राज्यातील १६ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत असलेल्या ग्रामीण परसातील कुक्कुट पालन “स्वयंम प्रकल्प” या योजनेच्या स्वरुपात बदल करुन ही योजना सन २०१९-२० मध्ये भटक्या जमाती (क) प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांसाठी राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या सहमतीने पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदरची योजना राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्हयांमधील प्रति जिल्हा १००० लाभार्थ्यांना ७५ टक्के शासकीय अनुदान व उर्वरित २५ टक्के लाभार्थी स्वहिस्सा या तत्वावर राबविण्याचे प्रस्तावित आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. ७०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजना क्र.१३ :-** नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती या महसूली विभागांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी भटक्या जमाती-क प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करणे.

**योजनेचे स्वरुप** :- राज्याच्या महसूली विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी राज्य शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विकास विभागाच्या मालकी हक्कातील जागा विनावापर पडून आहेत. या जागांचा उपयोग वसतिगृह बांधण्यासाठी होवू शकतो. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती या ठिकाणी भटक्या जमाती-क प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्याची सदर योजना प्रस्तावित आहे. सदर योजनेंतर्गत महसूली विभागस्तरावरील जिल्हयांच्या ठिकाणी मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येईल. सदर योजना पशुसंवर्धन विभागाच्या सहमतीने विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक रु. १४०.०० कोटी एवढया अंदाजित खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त नमूद एकूण १३ योजनांच्या प्राथमिक स्वरुपाच्या आराखडयास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठी विहित कार्यपध्दती, योजनेच्या लाभार्थ्यांसाठी पात्रतेचे निकष व अटी निश्चित करुन निधीच्या उपलब्धतेसाठी योजनानिहाय स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागामार्फत वित्त व नियोजन विभागास स्वतंत्ररित्या सादर करुन प्रत्येक योजनेबाबतचे स्वतंत्र शासन निर्णय संबंधित प्रशासकीय विभागाचे प्रभारी मंत्री यांच्या मान्यतेने निर्गमित करावेत. वित्त व नियोजन विभागाच्या मान्यतेअंती विहित कार्यपध्दतीनुसार योजना अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारा निधी अर्थसंकल्पित करण्याची कार्यवाही विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाने करावी. सदर योजनांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यास संबंधित प्रशासकीय विभागांना प्राधिकार देण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४६८/२०१९/ व्यय-१४, दि.२९.०७.२०१९ तसेच नियोजन विभागाने दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०७१७२१३५६२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

RAVINDRA
VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.08.07 17:26:55 +05'30'

**(रविंद्र गुरव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अ.मु.स./प्र.स./सचिव.
३. मा.मंत्री व राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद.
६. अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व) यांना प्रत अग्रेषित करुन विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयातील तरतुदी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास त्वरित आणाव्यात.

७. प्रधान सचिव (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग), मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक त्या त्वरित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०. आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२. अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. प्रादेशिक उप आयुक्त (पशुसंवर्धन) (सर्व)
१४. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
१५. सहायक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)